# सायबर सुरक्षेवर अभियान राबवणार

## एसएसव्हीपीएस महाविद्यालयातील चौघांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड

**प्रतिनिधी** | धुळे

क्विक हिल फाउंडेशनतर्फे शहरातील एसएसव्हीपीएस संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या चार विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली आहे.

या अभियानासाठी साक्षी देवरेची क्लब प्रेसिडेंट, प्रशांत भदाणे याची क्लब सेक्रेटरी, अजय खैरनार कम्युनिटी डायरेक्टर, श्रेया विसपुते पीआर डायरेक्टर तर समन्वयक म्हणून प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांची निवड झाली आहे. सायबर सुरक्षा अभियान राबवण्यासाठी पुण्यातील क्विक हिल फाउंडेशनच्या ऑफिसमध्ये नुकतेच प्रशिक्षण शिबिर झाले. या वेळी सीनिअर मॅनेजर अजय शिर्के म्हणाले की, प्रत्येकाने स्वतःला ओळखावे. स्वतःच्या व्हॅल्यूवर दृढ राहावे असेही ते म्हणाले. या वेळी त्यांनी सायबर सुरक्षा अभियानाची माहिती दिली. क्विक हिल फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्युटिव्ह सुगंधा दाणी व गायत्री पवार यांनी अभियानाची रूपरेषा सांगितली. फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधला. निवड झालेले विद्यार्थी पुढील काही महिन्यांसाठी या अभियानांतर्गत जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये तसेच जनमानसात सायबर क्राइम विषयी जागरूकता निर्माण करणार आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे चेअरमन आमदार कुणाल पाटील, उपाध्यक्ष एस. टी. पाटील, उपप्राचार्य के. एम. बोरसे, विभाग प्रमुख प्रा. राकेश देवरे यांनी समाधान व्यक्त केले.



सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानांतर्गत क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक.